शनिवार, दि. १२ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३३६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा खासदार गावात

### सिरजगाव घाटी येथे खासदार आल्याने आनंद

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यातील शेवटच्या कोपऱ्यात व डोंगराळ भागात असलेल्या व बदनापूर विधानसभा व जालना लोकसभा मतदार संघातील सिरजगाव घाटी येथे आतापर्यंत कोणताच लोकप्रतिनिधी म्हणून खासदार फिरकले नाही. त्यामुळे गावात खासदार यावा अशी आपेक्षा अनेक गावकर्यांची होती. तिच आपेक्षा नव्याने निवडून आलेले खासदार डॉ. कल्याण काळे हे आज सिरजगाव येथे येताच गावकऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.



यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी गावातील समस्या व इतर घडामोडीबाबत गावकऱ्यांशी चर्चा केली. येथील गावकऱ्यांनी समस्या सांगतानाच ते म्हणाले की आमच्या गावात हिंदुस्थान स्वातंत्र्य झाल्यापासून यापुर्वीच्या खासदाराने फिरकूनही बघितले नसल्याचे सांगितले. तसेच गावातून यापुर्वीच्या माजी खासदारालाच निवडणुकीत लिड असल्याचे सांगितले. मात्र खासदार डॉ. कल्याण काळे यांनी याबाबत कुठलाही विचार न करता सिरसगावात भेट देवून येथील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.

या वेळी मा. सभापती अंकुशराव शेळके,पांडुबाबा शेजुळ, रेवणनाथ मारोती कुबेर, साडु पा शेजुळ, परमेश्वर दामोदर देवकर, नेताजी विठ्ठलराव शेजुळ, नारायण रामकिसन शेजुळ, श्रीमंत एकनाथ शेजवळ, देविदास साहेबराव पवार, विश्वनाथ गंगाराम उगले आदींसह गावकऱ्यांची उपस्थिती होती.

## गांधीनगर भागातील तोडण्यात आलेला सर सय्यद अहेमद खान चौक बनवुन द्या

### महापालिका आयुक्तांकडे मागणी



**जालना । प्रतिनिधी** - जालना महानगरपालीका हद्दीतील प्र.क्र. १९ गांधीनगर, रिलॅक्स मेडीकल, रहेमानिया मस्जिद जवळ, येथे नगर पालीके मार्फत ठराव घेऊन मागील अनेक वर्षापूर्वी येथील चौकास सर सय्यद अहेमद खान चौक असे नांव देण्यात आले होते तसेच तेथे नगर पालीकेतर्फे चौकाचे बांधकाम करण्यात आलेली होते. परंतु काही दिवसापूर्वी या चौकात सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यात आलेले आहे. त्यावेळी हा चौक कोणतीही सुचना अथवा परवानगी न घेता काढुन टाकण्यात आलेला आहे, त्यामुळे येथील नागरीकांच्या भावना दुखावल्या गेल्या आहे.

तरी पूर्वी झालेल्या ठरावा प्रमाणे या काढून टाकण्यात पान २ वर

## घनसावंगी तहसिल कार्यालयात मंगळवारी सरपंच पदाची आरक्षण सोडत

**घनसावंगी । प्रतिनिधी** - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक संदर्भात जिल्हाधिकारी यांना प्राप्त अधिकारान्वये घनसावंगी तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण सोडत तहसिल कार्यालय घनसावंगी येथे बैठक कक्षामध्ये मंगळवार दि. १५ जुलै २०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता आरक्षण सोडत होणार आहे. ही आरक्षण सोडतीस उपविभागीय अधिकारी अंबड यांच्या संनियंत्रणात प्रारंभ होईल. अशी माहिती प्रभारी पान २ वर

## छत्रपती कॉलनी अनधिकृतरित्या बंद करण्यात आलेला सार्वजनीक रस्ता त्वरीत खुला करा

### साद बिन मुबारक यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी** - छत्रपती कॉलनी येथील कुच्चरवटा ते जुना कदिम जालनाकडे जाणारा रस्त्याच्या बाजुला असलेले लोखंडी गेट बंद करून तेथे भिंत उभी करून सदर पुर्वापार चालत आलेला वहिवाटीचा रस्ता बंद करण्यात आलेला आहे. संबंधीत रस्ता बंद केल्यामुळे या भागातून जुने तहसिल कार्यालय, रजिस्ट्री ऑफीस कडे जाणाऱ्या लोकांची तसेच नुतन विद्यालयात जाणारे विद्यार्थी, नुतन विद्यालयाचे वसतिगृह येथील विद्यार्थ्यांना देखील मोठी अडचण निर्माण झालेली आहे. या लोकांना जाणे येणे करण्यासाठी मुक्तेश्वर वेस ते कचेरी रोड मार्गे वळसा घालून यावे जावे जागते.

हा रस्ता बंद करण्यासाठी संबंधितांनी कोणत्याही कार्यालयाची परवानगी घेतलेली नाही. या बाबत माहिती अधिकारात माहिती मागवली असता त्यांना कोणत्याही कार्यालयाने परवानगी दिलेली नसल्याचे लक्षात येते तसेच सदर छत्रपती कॉलनीचे ले-आऊट पाहिले असता सदर ठिकाणी रस्ता अस्तित्वात आहे. असे असतांना संबंधितांनी या रस्त्यावर सिमेंट कॉँक्रीटची भिंत बांधून हा रस्ता बंद केलेला आहे. विशेषतः पान २ वर



## तहसिल कार्यालय जालना येथे सोमवारी आरक्षण सोडत

**जालना । प्रतिनिधी** - तहसिलदार जालना यांना प्राप्त अधिकारान्वये जालना तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण सोडत तहसिल कार्यालय जालना येथे तहसिल कार्यालय जालना येथे सोमवार दि. १४ जुलै २०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता आरक्षण सोडत पान २ वर

युवा आदर्श

### सेवाभाव ...

गुलाम होऊन राही
सेवा करी मनोभावे
स्वातंत्र्य मुक्त करे
आता ते अनुभवावे
सवय रे दास्यत्वाची
जी हुजूरीचं निभावे
दबे कायम ओझ्यांत
भित्रट होई स्वभावे
आम्ही भक्त आंधळे
सांगे करे आयुर्भावे
दावणीला बांधलेले
लोढणे दावे अहंभावे
जखडून गेलो पुरते
बांडगूळ वृत्ती प्रभावे
व्यवस्था मालकांची
ऋणांत नेहमी दबावे
स्वयंप्रकाश विसरलो
असूनि स्वता काजवे
पंखा खाली दुजांच्या
फुके पराक्रम गाजवे
आत्मनिर्भरता नुरली
लावली त्यांचीचं नावे
शिकलो केवळ एवढे
रे लाचार भाट बनावे
सुरात सूर मिळवाया
गुलाम गळ्यांस ठावे
स्वताचा स्वर असूनि
कोरस शिस्तीत गावे

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## लक्ष्मी मुक्ती योजना महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी महत्त्वाची - तहसीलदार सारिका भगत

**टेंभूर्णी । प्रतिनिधी** - ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांना शेतमालकीत सहभाग मिळावा यासाठी शासनाने 'लक्ष्मी मुक्ती योजना सुरू केली आहे. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट महिलांना शेतमालमत्तेवर थेट हक्क प्रदान करणे आहे. या योजनेंतर्गत पती आपल्या नावावरील सातबारा उताऱ्यावर बायकोचे नाव सहहक्कदार म्हणून अधिकृतपणे नोंदवू शकतो. या उपक्रमामुळे महिलांना केवळ मालकीचा अधिकारच मिळणार नाही तर त्यांना आर्थिक निर्णय प्रकियेत सहभागी होता येणार आहे. अशी माहिती जाफराबाद च्या तहसीलदार सारिका भगत यांनी दिली. त्या म्हणाल्या की, अर्ज करण्यासाठी महिलांनी आपल्या गावातील तलाठी कार्यालयात थेट संपर्क साधावा, तलाठ्यांकडे पत्नीचं नाव सहहिस्सेदार म्हणून सातबारा उताऱ्यावर नोंदणीसाठी अर्ज सादर करावा लागेल. ही प्रक्रिया स्थानिक पातळीवर सहज आणि पारदर्शकपणे पूर्ण केली जाते. या अर्जासोबत विवाह पत्रासह काही महत्वाची कागदपत्रे जोडावी लागणार आहे. लक्ष्मी योजनेअंतर्गत पत्नीचं नाव सातबारा उताऱ्यावर सहहिस्सेदार म्हणून नोंदविण्यासाठी कोणत्याही प्रकारची नोंदणी फी , शासकीय शुल्क, मुद्रांक शुल्क आकारले जात नाही ही योजना प्रक्रिया पूर्ण विनामूल्य असून कोणत्याही दलालांच्या भूलथापांना बळी पडू नये असे आवाहन जाफबरादातहसीलदार सारिका भगत यांनी केले आहे.

## गुरुपौर्णिमेनिमित्त दयानंद दरबारात कार्यक्रम संपन्न

**जाफ्राबाद । प्रतिनिधी** - गुरुपौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील कुंभारझरी रोडवर असलेल्या दयानंद बाबा दर्गा येथे जाफराबाद तालुक्यातील भाविकांनी दर्शन घेण्यासाठी उच्चाकी गर्दी दिसून आली. सुमारे हजारो भाविकांनी या ठिकाणी दयानंद बाबा दर्याचे दर्शन घेतले. गुरूचा महिमा व लीला अगाध असून संत हवं जगाचे कृपाळू माय-बाप आहे. गुरुबद्दल असलेल्या भक्तीभावला शेवटच्या श्वासापर्यंत जपा, असे आवाहन परम पूज्यनिय विनायक गुरू बाबांनी यावेळी सागितले. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने पहाटेच्या सुमारास भगवान दयानंद बाबा दर्गा यांची मानमानता करण्यात आली. त्यानंतर टेंभुर्णी परिसरातील पंचक्रोशीतील भाविकांनी या ठिकाणी दर्शनासाठी रांग लावली. परम पुज्यनिय गुरू विनायक गुरू हे गेल्या ३२ वर्षांपासून या ठिकाणी गुरुपौर्णिमा साजरी करत असून दर पौर्णिमा उत्सवाला या ठिकाणी लोकवर्गणीतून भव्य दिव्य असा भंडारा करण्यात येतो.



## संपादकीय

### घटस्फोटाचे वाढते प्रमाण चिंताजनक

लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात असे म्हटले जाते. पूर्वी या गाठी घट्ट बांधल्या जायच्या कारण या गाठी आयुष्यभर तुटत नसायच्या. इतकंच काय तर हाच जोडीदार पुढील सात जन्मी मिळो अशी प्रार्थना पतिपत्नी देवाकडे करायचे. हल्ली मात्र या लग्नाच्या गाठी सैल बांधल्या जातात की काय अशी शंका येऊ लागली आहे कारण आयष्यभर सोडाच पण काही वर्षे देखील विवाह झालेले दांपत्य एकत्र नांदायला तयार नाहीत. लग्नानंतर अवघ्या काही वर्षात पतीपत्नीमध्ये वाद होतो आणि हा वाद थेट घटस्फोटापर्यंत पोहचतो. आज देशातील न्यायालयात घटस्फोटाचे लाखो याचिका प्रलंबित आहेत. दररोज त्यात भर पडतेच, घटस्फोटाची नवी याचिका दाखल झाली नाही असा एकही दिवस उगवत नाही. घटस्फोटाचे लाखो खटले प्रलंबित असल्याने सहा महिन्यांचा आत घटस्फोटाचा निकाल द्यावा असा निर्णय न्यायालयाने घेतला आहे. घटस्फोटाचे खटले तातडीने निकाली काढले जात असले तरी त्यात नव्याने भर पडत असल्याने न्यायालयही हतबल झाले आहे. वास्तविक दोन दशकांपूर्वी घटस्फोटाचे प्रकरण नगण्य स्वरूपात होते. शेवटचा पर्याय म्हणून घटस्फोटाकडे पाहिले जात होते आज मात्र अगदी किरकोळ कारणांवरून देखील घटस्फोट मागितला जातो. आज न्यायालयात दाखल होणाऱ्या घटस्फोटाची कारणे पाहिले तर चक्रावून जाल. पत्नीला साडी नेसता येत नाही, पत्नीने केलेला स्वयंपाक बेचव असतो, पत्नी सतत टीव्ही आणि मोबाईलवर असते, पत्नी आपला मान राखत नाही यासारख्या हास्यास्पद आणि मनाला न पटणाऱ्या कारणांनी घटस्फोट मागितला जातो. पत्नीकडूनही घटस्फोटाची अशीच काहीबाही कारणे दिली जातात. पती आपल्याला वेळ देत नाही. पती फक्त त्याच्या आई वडिलांचेच ऐकतो, पती आपल्याला बाहेर फिरायला नेत नाही, पती आपल्या मनासारखं वागत नाही अशी हास्यास्पद कारणे देऊन घटस्फोटाची मागणी केली जाते. घटस्फोटाची ही किरकोळ कारणे जितकी हास्यास्पद वाटतात तितकीच ती चिंताजनक देखील आहेत कारण अशा किरकोळ कारणांनी जर घटस्फोट होऊ लागला तर विवाह संस्थाच धोक्यात येईल. याशिवाय पती मारहाण करतो, अनैसर्गिक संबंधांची मागणी करतो, पत्नी उलट बोलते, पती म्हणून मान देत नाही अशा कारणांनी देखील घटस्फोटाची मागणी केली जाते अशी आणि यापेक्षाही अनेक वेगवेगळी कारणे घटस्फोटासाठी दिली जातात अर्थात सर्व कारणांचा अभ्यास करूनच न्यायालय घटस्फोटाचा निकाल देते. अर्थात अशा किरकोळ कारणांसाठी घटस्फोटाची मागणी करणे कितपत योग्य आहे याचा विचार दोघांनीही करायला हवे. नाते कोणतेही असो त्यात राग रुसवा असतोच, संसार म्हटले की भांड्याला भांडे लागतेच, जर दोघात वाद झाला की दोघांपैकी एकाने शांत राहावे थोड्या वेळात राग शांत होतो आणि वादही मिटतो मात्र शब्दला शब्द दिला की वाद वाढतो आणि वादाचे रूपांतर मोठ्या भांडणात होते. त्यात दोन्ही कडील नात्यात कोणीना कोणी तेल ओतणारा असतोच, असे तेल ओतणारे व्यक्ती आल्यास हा वाद थेट न्यायालयात पोहचतो. अगदी क्षुल्लक कारणही नाते तोडायला पुरेसे ठरत असल्याने नात्याची गुंफण घालताना थोडे सावरूनच वागावे लागते. माझे चुकलेच हे मनाने मान्य करावे लागते. तरच नाते टिकते आणि त्यातही गोडवा राहतो. नात्यात सर्वात महत्वाचा असतो तो विश्वास. जर विश्वासाला तडा गेला तर नात्यात वितुष्ट येतेच म्हणून पतिपत्नी मध्ये विश्वास खूप महत्वाचा आहे विश्वासाला तडा जाऊ न देण्याची जबाबदारी दोघांचीही आहे. नात्यात दुरावा होण्याचे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे पतीपत्नीमध्ये असलेला अहंकार. अहंकारामुळेच नाती तुटतात म्हणूनच दोघांनीही अहंकार दूर ठेवायला हवा. अहंकाराला दूर ठेवून परस्परावरील विश्वास कायम ठेवला तर नात्यात दुरावा निर्माण होणार नाही आणि घटस्फोटाचे प्रमाणही कमी होईल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### पान १ वरून

#### गांधीनगर भागातील ...

आलेल्या चौकाची दुरुस्ती आणि सुशोभीकरण करुन तेथे सर सय्यद अहेमद खान चौक असे नामफलक लावुन देण्यात यावे, अशी मागणी आज दि.११ शुक्रवार रोजी दुपारी चार वा. च्या सुमारास महापालिका आयुक्तांकडे निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. या निवेदनावर नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या चौकाबाबत आता महानगरपालिका काय निर्णय घेते या कडे मुस्लिम बांधवांचे लक्ष लागले आहे. दिलेल्या निवेदनावर शहेबाज़ अंसारी,वसिम लाला, सैफ अंसारी, आमान शेख, आतिक सय्यद, काशिफ अंसारी, समीर शेख, सय्यद रहीम, वाजेद पठाण ई. च्या स्वाक्षऱ्या आहेत.

#### छत्रपती कॉलनी ...

दुचाकी वाहन, चारचाकी वाहनांना येथून जाण्यासाठी अडथळा निर्माण झालेला आहे.सदर रस्ता बंद करणाऱ्यांवर त्वरीत फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करण्यात यावी व जनतेला हा रस्ता त्वरीत खुला करून द्यावा अशा आशयाचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते साद बिन मुबारक यांनी आज दि.११ शुक्रवार रोजी दुपारी तीन वा. च्या दरम्यान जिल्हाधिकारी यांना दिले आहे.

#### घनसावंगी तहसिल ...

तहसिलदार मोनली सोनवणे घनसावंगी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

#### तहसिल कार्यालय ...

काढण्यात येणार आहे. तरी सर्व नागरिकांना सरपंच पदाचे आरक्षण काढण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन तहसिलदार जालना छाया पवार यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

---

श्रीक्षेत्र तुळजापूर येथे समस्त हिंदुत्वनिष्ठ व धार्मिक संघटना यांची एकमुखी मागणी !

# तुळजापूर येथील प्राचीन ब्रह्मदेवाची मूर्ती भंगल्याप्रकरणी तत्काळ शासकीय अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून कारवाई करा !

**तुळजापूर । प्रतिनिधी** - श्री तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचे काम सुरू होण्यापूर्वीच मंदिर परिसरातील २० उपदेवतांची मूर्ती हलवण्यात आल्या आहेत. मंदिर रचना बदलाची कामे सुरु करतांना कोणतीही योग्य ती काळजी न घेतल्याने प्राचीन श्री ब्रह्मदेवाची मूर्ती निष्काळजीपणामुळे दुभंगली आहे. त्यामुळे हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. अनेक तक्रारी करूनही गेली अडीच महिने दोषी शासकीय अधिकाऱ्यांवर अद्याप गुन्हे का दाखल झाले नाही ? दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी पत्रकार परिषदेत केली.

तुळजापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत महाराष्ट्र मंदिर महासंघाचे श्री. विनोद रसाळ, हिंदू जनजागृती समितीचे सोलापूर जिल्हा समन्वयक श्री. राजन बुणगे, पाळेकर पुजारी श्री. नागनाथ भांजी, पाळीकर मंडळाचे माजी अध्यक्ष श्री. किशोर गंगणे, महंत इच्छा गिरी महाराज, महंत माऊली नाथ महाराज, परमेश्वर भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष श्री. अमर राजे कदम, हिंदू राष्ट्र सेनेचे जिल्हा प्रमुख आणि श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे श्री. परिक्षीत साळुंखे उपस्थित होते

अनादी कालापासून मंदिरात चालू असलेले कुलाचार, वंशपरंपरा व अन्य धार्मिक कृतीसाठी कुठलीही जागा आराखड्यात न ठेवणे हे गंभीर असून ते हिंदूंच्या श्रद्धेवर आघात करण्यासारखे आहे. त्यामुळे स्थानिक पुजारी मंडळ, हिंदुत्वनिष्ठ संघटना, धार्मिक संघटना, ग्रामस्थ यांमध्ये संताप निर्माण झाला आहे. विशेषतः गाभाऱ्यातील सभामंडपाला तडे गेल्याने त्याचा जीर्णोद्धार केला जाणार आहे. मंदिर रचनेत कोणतेही बदल करतांना अथवा नवीन विकास आराखडा अंतिम करण्यापूर्वी मूळ मंदिराच्या ऐतिहासिक, धार्मिक, तसेच वास्तुरचनेला कोणताही छेद दिला जाणार नाही, याची शासनाने खात्री देण्याची आवश्यकता आहे.

श्रीब्रह्मदेवाची मूर्ती आधीच भंगलेली असल्याचा दावा दिशाभूल करणारा व खोडसाळ आहे. पूर्वी ती मूर्ती अखंड व व्यवस्थित होती. त्याचे पुरावे आहेत. मूर्त्या हलवतांना श्रीब्रह्मदेव मूर्ती दुंभली असल्याने त्याची सखोल चौकशी करून




दोषींवर फौजदारी कारवाई आवश्यक आहे. मंदिर विकास आराखड्यात पारदर्शकता यावी. लेखी दस्तऐवज जाहीर करण्यात यावे. आराखड्याचा धार्मिक दृष्टिकोनातून आढावा घेण्यासाठी धर्मशास्त्राचे अभ्यासक, धर्माचार्य आणि शंकराचार्य पिठांचे विचार जाणून घेणे अत्यावश्यक आहे. कुलाचार, प्राचीन परंपरा, वंशप्रथा यासाठी स्वतंत्र जागा आराखड्यात स्पष्टपणे दर्शवावी. मुख्य प्रवेशद्वार पूर्वीप्रमाणेच ठेवावे. मागून नवीन द्वार तयार करून मंदिराची रचना बदलू नये.

आराखड्याबाबत सर्व **स्थानिकांचे मते विचारात घ्यावे !** : या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर श्री तुळजापूर संरक्षण कृती समिती, महाराष्ट्र मंदिर महासंघ, समस्त हिंदुत्वनिष्ठ संघटना, पुजारी मंडळ, स्थानिक ग्रामस्थ यांची एक बैठक जिल्हाधिकारी व पालकमंत्री यांनी बोलवावी. या बैठकीत आराखडा व मंदिरासंदर्भातील सर्व सूत्रांबाबत चर्चा करणे आवश्यक आहे, अशीही ठाम मागणीही या वेळी सर्व संघटनांनी केली.

---

# युवा वर्गामध्ये हृदयविकारांचा वाढता आजार चिंताजनक!

पुर्वी हृदयविकाराचे आजार (हार्डअटॅक) याबाबत एक वयोमर्यादा होती साधारणतः वयाच्या ६० वर्षांनंतर या आजारांचे प्रमाण जास्त रहायचे.परंतु गेल्या काही वर्षांत ३० ते ५० वर्षे वयोगटामध्ये हृदयविकाराच्या आजारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. कारण गेल्या काही वर्षांमध्ये प्रत्येक व्यक्तींची रहानिमानाची,खानपानाची,मादक द्रव्ये व अन्य व्यसन यामुळे दिनचर्येच्या शैलीमध्ये मोठ्या प्रमाणात बदलाव आल्याचे दिसून येते.पंजाब मधील फिरोजपुर मधील गुरूहर सहाय या मैदानावर दिनांक २९ जून २०२५ रविवारला हरजीत सिंह नामक युवा क्रिकेट खेळाडू बैटींग करतांना छक्का मारला व अचानक हार्ट अटैक आला व तो तिथेच पडला आणि त्याचा मृत्यू झाला ही धक्कादायक बाब आहे.यामुळे सर्वांचेच हृदय हळूहळून आले व खेळाडूंमध्ये शोककळा पसरली.यापुर्वीही मुंबईमध्ये जून २०२४ मध्ये क्रिकेट मैचच्या दरम्यान राम गणेश तेवर नामक खेळाडूने छक्का मारल्या बरोबर हृदयविकाराचा झटका आला व क्रिकेट खेळतांना अशीच हृदयद्रावक घटना घडली व या ४२ वर्षीय या खेळाडूचा मृत्यू झाला.२०२४ मध्ये अशाप्रकारे पुणे येथील गरवारे स्टेडियममध्ये इमरान पटेल नामक खेळाडू ३५ वर्षीय क्रिकेट मैच खेळताना हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाला.यावरून स्पष्ट होते की अटैकचे (हृदयविकाराच्या आजारांचे) प्रमाण दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे.हृदयविकाराच्या मृत्यूचे अनेक कारणे असू शकतात मादक द्रव्ये सेवन करणे, धुम्रपान, तंबाखू, गुटका,मद्य सेवन यांचाही हृदयविकारावर मोठ्या प्रमाणात गंभीर परिणाम होतो व पुढे चालून मृत्यूचे कारण बनत असते.त्याचप्रणाणे मोबाईलचा जास्त प्रमाणात वापर, वाढता तनाव,अनियमित जीवनशैली, दिनचर्येत फास्ट फूडचे वाढते प्रमाण,आहाराची ढासळती गुणवत्ता,वेळोवेळी आरोग्याची काळजी न घेणे व व्यायामाचे कमी प्रमाण,वाढते लठ्ठपणा,इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम युवावर्गामध्ये होत असल्याने हृदयविकाराच्या आजारांचाधोका वाढतो आहे. युवावर्गामध्ये हृदयविकाराच्या आजारांमध्ये भर टाकली(बीपी व शुगर) डायबिटीजने हाई ब्लड शुगरचा सरळ प्रभाव हृदयविकाराच्या आजारांवर होतो.या आजारांचे मुख्य कारण म्हणजे मसालेदार पदार्थ,ऑयली फूड,फास्ट फूड,अती कोल्डिंक्स घेणे आणि मिठाई यामुळे डायबिटीजचे प्रमाण वाढुन सरळ हृदयविकारांचे आजार होत आहे किंवा होवू शकतात.सोबतच सध्याच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे व वाढत्या प्रदूषणामुळे सुध्दा हृदयविकाराचे आजार दिसून येतात.आपण पाहिले की सध्याच्या परिस्थितीत अनेक अभिनेता,गायक, हास्य कलाकार आणि निर्देशक याचा हृदयविकाराच्या आजारांनी मृत्यू झाल्याचे आपण पाहिले.यात वयोमर्यादा ३०,४०,५० वर्षे अशा प्रमाणे कमी वयोमर्यादा आहे.या वयात हृदयविकाराच्या आजारांने मृत्यू (हार्डअटॅक) होत असेल तर ही बाब अत्यंत चिंताजनक, गंभीर व धक्कादायक आहे.त्यामुळे वाढते हृदयविकारांचे आजार किंवा अन्य आजार पहाता सर्वांनीच आपल्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

---

# ग्रोव्हिजन गटशेती संघाद्वारे अकोला देव येथे सीताफळ लागवडीचा शुभारंभ



**जालना । प्रतिनिधी -** ग्रोव्हिजन गटशेती संघाच्या स्वबळावर शाश्वत दिशादर्शक प्रायोगिक प्रकल्प अंतर्गत वार्षिक एक दिवशीय सामूहिक सीताफळ लागवडीचा जाफराबाद तालुक्यातील अकोला देव येथे शुक्रवार दि. ११ जुलै २०२५ रोजी ग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांच्या हस्ते वार्षिक शुभारंभ करण्यात आला. लागवड ते थेट सामूहिक विक्री हे ग्रोव्हिजन गटशेती संघांचे सीताफळ लागवडीचे सामान्य शेतकऱ्यांसाठी एक परिपूर्ण मॉडेल आहे.

श्री. दत्तात्रय सवडे यांच्या शेतात पार पडलेल्या या कार्यक्रमास श्री. दत्तात्रय सवडे, सुभाष सवडे, सोमीनाथ सवडे, वैभव सवडे, अरुण भारती हे उपस्थित होते.

---

# जयश्री सोनकवडे यांची जातीय द्वेषभावनेतून बदनामी करणाऱ्या विरूध्द कारवाई करा

## नंदा पवार यांची सामाजिक मंत्री यांच्याकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जात पडताळणी समितीच्या विभागीय उपायुक्त श्रीमती जयश्री सोनकवडे यांची जातीय द्वेषभावनेतून बदनामी करणाऱ्या व्यक्ती विरोधात कारवाई करण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनात महिला कॉंग्रेस कमिटी जिल्हाध्यक्षा नंदा पवार यांनी केली आहे.

या संदर्भात दिलेल्या निवेदनात नंदा पवार यांनी म्हंटले आहे की, श्रीमती जयश्री सोनकवडे ह्या सामाजिक न्याय विभागाअंतर्गत येणाऱ्या विभागीय जात पडताळणी समितीच्या विभागीय उपायुक्त म्हणून कार्यरत आहेत. एका मागासवगय कुटुंबातील जयश्री सोनकवडे यांनी मेहनतीने आपलं शिक्षण पूर्ण कुरुन एक महिला असतांना सुद्धा मोठ्या पदावर पोहचल्या. प्रामाणिक



व कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळख निर्माण झालेल्या श्रीमती जयश्री सोनकवडे यांची सामाजिक न्याय विभागातील काही कामचुकार व भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांनी महिलांना हाताशी धरून बदनामी करण्याचा उद्योग सुरू केला. प्रादेशिक उपायुक्त जलील शेख यांच्या गलथान आणि निष्क्रिय कामामुळे इतर मागास बहुजन कल्याण विभाग छत्रपती संभाजीनगर अंतर्गत सुरू असलेल्या जालना येथील आन्वी, तुपेवाडीच्या आश्रमशाळेची २०१९ मध्ये सोनकवडे ह्या उपसंचालक असतांना त्यांनी चौकशी केली. नंदिनी पवार या विद्यार्थ्यांनीचा उपचार न दिल्याने तडफडून मृत्यू झाला आणि फुलमाळी या विद्यार्थ्यांस उपचारांसाठी रुग्णालयात लवकर दाखल करण्यात आले नसल्याने त्यामुळे त्यांचा पाय कापावा लागला आहे. याबाबत तपासणी करून दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन सोनकवडे यांनी दिले होते. यांचा राग मनात धरून समाजकल्याण विभागाच्या जातपडताळणी उपआयुक्त जयश्री सोनकवडे यांना बदनाम करण्यासाठी समाज कल्याण विभागातील काही अधिकारी व कर्मचारी यांनी महिलांच्या माध्यमातून षडयंत्र रचले. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी मृत्यू प्रकरणात दोषी असूनही समाज कल्याण विभागाने प्रादेशिक उपायुक्त जलील शेख याचे निलंबन केले नाही. व अजूनही चौकशी केलेली नाही. एका आदिवासी गरीब कुटुंबातील मुलांना आजही न्याय मिळाला नाही. उपरोक्त प्रकरणात आपल्यावर कारवाई केली जाईल, या भीतीने जलील शेख व सध्या प्रादेशिक उप आयुक्त दिपक खरात हे महिलांना हाताशी धरून व खोटे आरोप करून श्रीमंती सोनकवडे यांची बदनामी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे एका मागासवगय तसेच प्रामाणिक व कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळख असलेल्या श्रीमती सोनकवडे यांची बदनामी करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई यावी अशी मागणी देखील या निवेदनात नंदा पवार यांनी केली.

---

# परतूर तालुक्यातील ग्रामपंचायतीचे नव्याने सरपंच पदाचे आरक्षण सोडत कार्यक्रम

**परतूर । प्रतिनिधी -** ग्रामविकास विभाग महाराष्ट्र राज्य यांचेकडील अधिसूचना क्र.ग्रापंनि-२०२५ /प्र.क्र.१३ /प.रा.-२ महाराष्ट्र ग्रामपंचायत (सरपंच आणि उपसरपंच) निवडणूक नियम,१९६४च्या नियम २ अ मधिल उपनियम (१) आणि (२) अन्वये व मा.जिल्हाधिकारी जालना यांचेकडील अधिसूचना जा.क्र.२०२५ / साशा / ग्रापंनि / स.आ.नि / कावी दि. ०७/०७/२०२५ अन्वये अधिसूचनेद्वारे परतूर तालुक्यातील एकुण -८१ ग्रामपंचायतीचे अनु. जाती, अनुसूचित जमाती,नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि महिला , खुल्या प्रवर्ग आणि सर्वसाधारण महिला (अनु.जाती, अनुसूचित जमाती, आणि नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) परतूर तालुक्यातील नव्याने सरपंच पदांचे आरक्षण अनुसुची १ व २ अन्वये दि.१५/०७/२०२५ रोजी प्रर्यंत निश्चित करण्याचा कार्यक्रम प्राप्त झालेला होता.त्या अनुषंगाने परतूर तालुक्यातील एकुण -८१ ग्रामपंचायतीच्या सन- २०२५ ते २०३० या कालावधीत गठित होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मा.अवर सचिव , महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्रमांक ग्रापनि/२०२५/ प्र.क्र.१३/पं.रा.-२ दि.०७ जुलै २०२५ अन्वये परतूर तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षणामध्ये कोणताही बदल होत नसला तरी नव्याने सरपंच आरक्षण सुनिश्चित करणे क्रम प्राप्त आहे.त्यानुसार नव्याने सरपंच आरक्षण सोडत काढण्यासाठी मा.श्री. पदमाकर गायकवाड संनियंत्रण अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परतूर यांचे अध्यक्षतेखाली दि.१४/०७/२०२५ रोजी सकाळी अकरा वाजता तहसील कार्यालय परतूर येथील सभागृहात आयोजित करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर कार्यक्रमांत मा.जिल्हाधिकारी जालना यांचेकडून प्राप्त झालेल्या अनुसूचीनुसार ग्रामपंचायत निहाय सरपंच पदाचे आरक्षण खालील प्रमाणे काढण्यात येणार आहे.अनु. जातीसाठी एकुण ११ जागा असून त्यापैकी महिलांसाठी ०५ जागा राखीव आहेत. अनुसूचित जमातीसाठी एकुण,०१ जागा असून त्यांपैकी महिला,०० जागा राखीव आहेत.

नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी एकुण,२२ जागा असून त्यापैकी महिलांसाठी ११,जागा राखीव आहेत.सर्वसाधारण (खुल्या) प्रवर्गासाठी एकुण -४७ जागा असून त्यापैकी महिलांसाठी -२४ जागा राखीव आहेत. वरील प्रमाणे प्रवर्ग निहाय एकुण मिळणाऱ्या जागांपैकी महिलांना ५० टक्के आरक्षण रहाणार आहे. सदरील आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमासाठी परतूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीचे आजी, माजी , सरपंच, उपसरपंच,या. पं.सदस्य,लोकप्रतीनिधी, सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते व नागरिकांनी उपस्थित राहावे तहसीलदार परतूर यांचे मार्फत आवाहन करण्यात येत आहे.

# जालन्याजवळ साकारतेय ५१ फूट उंचीचे भारत माता मंदिर

## भगवानबाबा आनंदगडकर यांच्या संकल्पनेतून सर्वधर्मीयांना एका धाग्यात आणत राष्ट्रभक्ती चेतविण्याचा प्रयत्न

**जालना । प्रतिनिधी -** महान संत ह. भ. प. डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांच्या संकल्पनेतून जालना शहराजवळील नंदापूर येथे तब्बल ५१ फूट उंचीचे भारत मातेचे मंदिर साकारले जात आहे. हे मंदिर संपूर्ण महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण देशात एक आदर्श ठरणार असून, सुरत (गुजरात) येथील भव्य भारत माता मंदिरानंतर नंदापूरचे हे मंदिर भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे भव्य भारत माता मंदिर ठरणार आहे. हे मंदिर केवळ एक धार्मिक केंद्र नसून, सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक त्याचबरोबर या ठिकाणी राबविले जाणारे विविध उपक्रम निराधारांना आधार, निराश्रीत विद्यार्थ्यांना आश्रय, तणावमुक्ती व रोजगाराभिमुख दृष्टिकोन असणारे ठरणार आहे. इथे कोणतीही जात, धर्म, पंथ, प्रांत भिंत ठरणार नसून, भारत माता ही सर्वांची आई या भावनेने सर्वांना एका धाग्यात बांधून राष्ट्रभक्ती आणि विश्वबंधुत्वाची संस्कृती रुजवली जाणार असल्याने हे मंदिर एकता, भारतमातेप्रती श्रद्धा आणि संस्कृती संस्कृतीचे प्रतीक त्याचबरोबर देशातील एक महत्त्वाचे पर्यटनस्थळ ठरणार आहे.

नंदापुर येथील समृद्धी महामार्गाच्या बाजूला साकारात असलेले ५१ फूट उंचीचे मंदिर ६ किलोमीटर अंतरावरून दिसणार, एवढी या मंदिराची उंची राहील.

भगवान बाबांनी भारत माता मंदिर उभारण्याचा संकल्प केल्यानंतर नंदापूरचे सामान्य आणि जेमतेम आर्थिक परिस्थिती असलेले शेतकरी जनार्दन पुंजाराम उबाळे यांनी त्यांच्याकडील सात एकरपैकी १ एकर शेती दान दिली आणि प्रसिद्ध मंदिरशास्त्र अभ्यासक अभियंते चंद्रप्रकाश शर्मा, भूषण देशमुख, एस. एन. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ४ महिन्यापूर्वी मंदिराच्या कामाला सुरुवात झाली, यासाठी दिलीपराव काळे, विष्णुपंत बुजाडे, गणेश सुपारकर, राजू सतकर, कल्याणराव देशपांडे, डॉ. सुभाष भाले, आधी प्रमुख कार्यकर्ते या कार्यात पूर्ण वेळ सेवा देत आहेत. जनतेच्या यथाशक्ती आर्थिक योगदानातून मंदिराची उभारणी केली जाणार आहे. सध्या पहिला स्लॅब पडला आहे. प्रत्येकी दहा फूट उंच याप्रमाणे ३० फुटाचे पायथ्याचे तीन टप्प्यातील काम झाल्यानंतर भारत मातेची भव्यमूर्ती विराजमान केली जाणार आहे. ही मूर्ती बंदिस्त गाभाऱ्यात नसल्याने किमान सहा किलोमीटर अंतरावरूनही सर्वांना दर्शनाचा लाभ होणार आहे. नवीन तंत्रज्ञान व पारंपारिक शैलीचा अनोखा संगम असलेल्या मंदिराचा कळस दक्षिण भारतातील मंदिर शैलीप्रमाणे राहणार असून, मंदिरात भारत माता मूर्ती प्रतिष्ठापनेसाठी सरसंघचालकांना निमंत्रित करण्यात येणार असून, त्यासाठी भगवान बाबांचे प्रयत्न सुरू आहेत.



या मंदिराची उभारणी तीन मजली आहे. खालील दोन मजल्यांमध्ये चिंतनासाठी हॉल, त्यातदेखील आणखी एक भारत मातेची मूर्ती राहील. उर्वरित जागेमध्ये दहा बाय दहा आकाराच्या दहा खोल्या असतील. तरुण पिढीला स्वातंत्र्यसंग्रामात बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांचा इतिहास माहिती व्हावा, प्रेरणा मिळावी यासाठी स्थायी स्वरूपात क्रांतिकारकांची चित्रमय प्रदर्शनी राहणार आहे. भगवान बाबा यांची कुटी, अत्यंत पवित्र वातावरणात साधना करता यावी, यासाठी सिद्धसाधक आश्रम राहणार असून तेथे निशुल्क व्यवस्था केली जाणार आहे. अनेकजण ताणतणावातून घर सोडून जातात, आत्महत्येचा प्रयत्न करतात त्यांच्यासह ज्यांना आधार नाही, अशांसाठी ही वास्तू आश्रयस्थान बनणार असल्याचे भगवान बाबांनी सांगितले. ते म्हणाले की, शिक्षणासाठी नव्हे सुकडीसाठी तुकडीत येऊन बसला याप्रमाणे तणावग्रस्तांना इथपर्यंत आणून हाताला काम, मुखात राम, इतका-तितका गाळ घाम या संतोक्तीनुसार त्यांच्या हाताला काम देण्यासाठी छोटे उद्योग या वास्तूत सुरू करून कष्ट करणे महत्त्वाचे आहे, ही भावना त्यांच्यात रुजवली जाणार आहे. सोबतच या ठिकाणी अनाथांच्या सेवेला विशेष प्राधान्य राहणार असून, जे विद्यार्थी वाड्या, तांडे आणि वस्त्यांवर राहतात, जिथे शिक्षणाची व्यवस्था नाही, अभ्यासासाठी योग्य वातावरण नाही, अशा विद्यार्थ्यांची या ठिकाणी निवास आणि भोजनाची व्यवस्था केली जाणार असून, त्यांनी १७ नंबरचा फॉर्म भरून दहावीची परीक्षा द्यायची, अशी संकल्पना आहे. या मंदिराच्या माध्यमातून केवळ श्रद्धास्थान नव्हे तर शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांची मालिकाही राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांसाठी देशभक्तीचे बाळकडू देणारे कार्यक्रम, संस्कार केंद्र, वाचनालय आणि प्रेरणादायी कार्यक्रम राबवले जाणार असल्याचे भगवान बाबांनी सांगितले.

### आर्थिक योगदान देऊन मंदिर उभारणीचे साक्षीदार बना - भगवान बाबा आनंदगडकर

आज देशाला शस्त्रांपेक्षा संवेदनशील मनांची गरज आहे. असे मन, जे दुसऱ्याच्या डोळ्यांतील अश्रू ओळखू शकेल आणि त्यासाठी काही पावलं उचलू शकेल, हे काम या भारत माता मंदिर वास्तूच्या माध्यमातून केले जाणार आहे. मंदिर केवळ भिंतींचे नसून देशप्रेम, कर्तव्यभावना आणि एकतेचे प्रतीक आहे. आज विविध समाजांचे कुलदैवत, कुलदेवता असतात; पण भारत माता ही अखिल भारतीय समाजाची आहे. तिला समर्पित असलेले मंदिर म्हणजे समाजाला एका धाग्यात बांधणारा केंद्रबिंदू त्याचबरोबर सर्वधर्मसमभाव आणि राष्ट्रीय अस्मितेचे मूर्त रूप असणार आहे. भारत माता मंदिराचे संकल्पचित्रही सादर करण्यात आले असून, सर्वांच्या आर्थिक योगदानावरच हे मंदिर उभे राहणार आहे. पहिला स्लॅब पडला आहे. या ठिकाणी भेट देऊन उद्योजक, व्यापारी, सर्वधर्मीय नागरिक, युवावर्ग आणि देशप्रेमी नागरिकांनी आर्थिक योगदान देऊन भारत माता मंदिर उभारणीचे साक्षीदार बनावे व अधिक माहितीसाठी ९४२१७०५०५१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन ह. भ. प. डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांनी केले आहे.

---

# अकोला देव -बावणे पांगरी रस्त्यांत मोठ मोठाले खड्डे, जाफराबाद सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील अकोला देव ते बावणे पांगरी ह्या रस्त्यांची मोठ मठाले खड्डे पडून वाहनधारकांना वाहतुकीला तारेवरली कसरत करावी लागत आहे या मार्गावरील अकोला देव ते, बुटखेडा ,डोणगांव ,सातेफळ डोणगांव, आसरखेडा मार्गे बावणे पांगरी हे सरासरी १७ किलोमीटर अंतराळ असून त्यामध्ये अकोला देव ते आसरखेडा पर्यंत दहा किलोमीटर रस्त्यावर मोठमोठाले खड्डे पडले असून ते खड्डे जाफराबाद सार्वजनिक बांधकाम विभागांनी दोन वेळा तू तर मुत्तर डाग डिगी करून करून लाखो रुपयांचे बिल लंपास केले आहे असल्याचे वाहनधारक जाणकार नागरिक सांगत आहे त्यामुळे आता या रस्त्यावरील खडीकरण करून डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी अकोला देव ,बुटखेडा ,पोखरी ,डोणगांव, आसरखेडा हे नागरिक करत आहे त्यामुळे जाफराबाद सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष देऊन रस्त्यांची पाहणी करून खडीकरण करून डांबरीकरण करण्यात यावा अशी मागणी जोर धरत आहे

तालुक्यातून जिल्हा ठिकाणी जोडलेला हा अकोला देव ते बावणे पांगरी मार्ग जुन्या काळापासून आत्तापर्यंत जैसे थे वैसे दिखता है या ग्रामीण भागातील नागरिकांना विद्यार्थ्यांना शेतकऱ्यांना शेतमजुरांना रुग्णांना छोटे मोठे व्यापाऱ्यांना सडक व रस्त्यांचे गरज असून च्या ग्रामीण भागात कोणी लक्ष देत नसल्याचे आरोप होत आहे तरी सार्वजनिक बांधकाम विभाग येणे लक्ष करून पुन्हा काम सुरू करण्यात यावे अशी मागणी जोर धरत आहे.



# इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत कै. मारोतराव देशमुख विद्यालयाचे यश



**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** कै. मारोतराव देशमुख विद्यालयची विद्यार्थिनी कु.परीधी श्रीकृष्ण आव्हाळे ही, इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत धारक झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने तिचे,अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.

टेंभुर्णी गावातून प्रथम तसेच जालना ग्रामीण कोट्यातून १२८ क्रमांक घेऊन विद्यार्थिनी धारक ठरली असून या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री समाधान दुनगहु,बालु धनवई,संतोष कोल्हे,मोहन मुनेमाणिक,संभाजी एंडोले, विजय काठोळे,एजाज बेग, गणेश आंधळे,विजय मघाडे, श्रीमती संगीता विधाते,श्रीमती माया पोटे,प्रल्हाद खारतुडे, शिक्षकेतर कर्मचारी सुधाकर वाघमोडे, पंजाबराव देशमुख, बालाजी जोशी, सुभाष जाधव सर्वांनी पुष्पगुच्छ देऊन, अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

---

# शिलवंत गोपनारायण यांना पीएच.डी प्रदान

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** येथील शिलवंत रमेश गोपनारायण यांना ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी पदवी प्रदान केली, त्यांनी अ कम्पेरेटिव्ह स्टडी ऑफ द जर्नल्स पब्लिश बाय अमेरिकन लायब्ररी असोसिएशन (ङ) याविषयावर डॉ.मधुकर गरड, सेवानिवृत्त ग्रंथपाल अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण केले आहे, त्यांना पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली, पदवी प्राप्त झाल्यानंतर ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी पदवी प्रदान केली, याप्रसंगी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. वैशाली खापर्डे मॅडम यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी डॉ. मिलिंद आठवले, सुरज तायडे, अमित साळवी, विकास सोनवणे, रामदास हिवाळे, अंकुश गवई, सोनाजी गवई, संतोष अंभोरे, अँड. सचिन निकाळजे, श्रीकांत पातोडे, विशाल पठारे यांच्यासह विभागातील सर्वच



विद्यार्थी व कर्मचारी तसेच मित्रमंडळी यांनी गोपनारायण यांचे अभिनंदन केलं केलं. शिलवंत गोपनारायण हे अकोला जिल्ह्याचे मूळ रहिवासी असून विद्यार्थी-प्राध्यापक चळवळीमध्ये संपूर्ण महाराष्ट्रात ते सक्रिय सहभाग नोंदवणारे प्राध्यापक आहेत, त्यांनी आपल्या या पदवीचे व यशाचे संपूर्ण श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याच्या व विचाराच्या प्रेरणेला तसेच त्यांचे आई वडील, लहान मोठे भाऊ वहिनी, आत्ता परिवार, गुरुजन वर्ग, सहकारी मित्र व त्यांचे राजकीय गुरू डॉ. अरुण शिरसाट यांना दिले आहे.

# लोकसंख्या नियंत्रण व बालविवाह प्रतिबंध ही काळाची गरज-ॲड. अश्विनी धन्नावत

## दानकुंवर कनिष्ठ महाविद्यालय जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त कायदेविषयक जागरूकता कार्यक्रम

**जालना । प्रतिनिधी -** लोकसंख्या वाढ ही केवळ आकड्यांपुरती मर्यादित नाही; ती शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि स्त्री सक्षमीकरण यांसारख्या मूलभूत गरजांवर ताण आणणारी बाब आहे. यावर वेळेत नियंत्रण ठेवले नाही, तर भविष्यात सामाजिक असमतोल निर्माण होईल तर दुसरीकडे बालविवाह हा मुलींच्या शिक्षण, आरोग्य आणि स्वातंत्र्यावर परिणाम करणारा गंभीर अन्याय आहे. तो कायद्याने रोखला गेला पाहिजे आणि त्यासाठी प्रत्येकाने सजग राहणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन बाल न्याय मंडळाच्या सदस्य ॲड. अश्विनी धन्नावत यांनी येथे बोलताना केले.

जागतिक लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने दानकुंवर कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, त्यावेळी ॲड. अश्विनी धन्नावत लोकसंख्या वाढ आणि बाल विवाह या विषयावर बोलत होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव न्या. करीम खान यांनी विधी सेवा प्राधिकरण हे केवळ न्यायदानासाठी नसून समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळावा यासाठी कार्यरत असलेली संवेदनशील संस्था असल्याचे सांगून विद्यार्थिनींनी आपल्या हक्कांची जाणीव ठेवली पाहिजे, आणि गरज भासल्यास योग्य कायदेशीर मार्गांचा अवलंब केला पाहिजे,असे ते म्हणाले.

याप्रसंगी कार्यक्रमात ॲड. मौजूद शेख यांनी बालकांचे हक्क या विषयावर तर ॲड. महेश धन्नावत यांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष संजय अग्रवाल यांनी विद्यार्थिनींना समाजभान व कायदेविषयक सजगता यावर मार्गदर्शन केले. प्राचार्या गायत्री शुक्ला यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. सुरेंद्र जैन यांनी केले.

कार्यक्रमास इयत्ता बारावीच्या विद्यार्थिनी व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# एक विद्यार्थी, एक झाड, एक सेल्फी

## गुरु पौर्णिमेनिमित्त गुरुकुलम् शिशुवाटिकेचा एक आगळावेगळा उपक्रम

**जालना । प्रतिनिधी** - गुरुपौर्णिमेनिमित्त आपण आपल्या आई-वडिलांच्या गुरुजनांच्या आणि जे आपल्याला रोजच्या दैनंदिन जीवनामध्ये मार्गदर्शन करतात अशा गुरूंच्या पाया पडून पुष्पगुच्छ देऊन आपण आजच्या गुरु पौर्णिमेच्या दिवशी आशीर्वाद घेत असतो अशाच प्रकारे आज बदनापूर येथील गुरुकुलम् शिशुवाटिकेमध्ये आगळावेगळा कार्यक्रम घेण्यात आला ज्यामध्ये श्री दत्तगुरू च्या प्रतिमेची आणि वृक्षाची पूजा करण्यात आली यामध्ये विद्यार्थ्यांना सांगण्यात आले की आज झाड किती महत्त्वाचे आहे झाड आपल्याला ऑक्सिजन देते त्यामुळे आपण श्वास घेऊ शकतो जर झाडच नसेल तर आपण जगू शकत नाही आणि त्यामुळे आपण आपल्या घरी गेल्यानंतर एक झाड लावायचे आहे आणि त्या झाडासोबत विद्यार्थी व पालक यांनी सेल्फी काढून शाळेच्या ग्रुप वर पाठवायची आहे . ज्या विद्यार्थ्याने झाडाचे संगोपन चांगल्या प्रकारे केलेले असेल त्या विद्यार्थ्याचे झाड हे चांगलं मोठं झालेलं असेल त्या विद्यार्थ्याचा शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये सत्कार करून बक्षीस दिले जाईल अशी माहिती शाळेचे व्यवस्थापक श्री नवनाथ गव्हाणे यांनी दिली . या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून बदनापूर नगरपंचायत चे नगराध्यक्ष श्री विजू नाना जर्हाड उपस्थित होते . यावेळी नगरअध्यक्ष जर्हाड म्हणाले की वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे। पक्षी ही सुस्वरे आळविती .



खरंच या ओवी प्रमाणे आज मला या चिमुकल्या सोबत आपल्या गुरुकुलम् शिशुवाटीकेमध्ये या देश सेवेच्या कार्याला माझे हात लागले याचा मला सार्थ अभिमान आहे. यावेळी उपस्थित नगराध्यक्ष विजय नाना जर्हाड , प्रमुख पाहुणे सहपत्नीक , मदनराव पाटील , कौशल्याबाई पाटील , अविनाश खाजेकर , डॉ. रामेश्वर पाटील ,छावा चे पदाधिकारी रवि पाटील दाभाडे , शाळेचे व्यवस्थापक नवनाथ गव्हाणे , शिक्षिका अश्विनी डिघे , योगिता सिरसाठ , निकिता लहाणे , आलेश कांबळे , व इतर नागरिक उपस्थित होते.

# जालना जिल्हा परिषद समोर मराठवाडा शिक्षक संघाचे धरणे आंदोलन



**जालना । प्रतिनिधी** - शासनाच्या विविध ध्येय धोरणाच्या संदर्भातील एकूण २६ मागण्यासाठी दुपारी ४ ते ६ च्या दरम्यान जिल्हा परिषद माध्यमिक विभाग जालना यांच्या कार्यालयासमोर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी धरणे आंदोलन केले हे आंदोलन मराठवाड्यातील आठही जिल्ह्यामध्ये आयोजित करण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी संपूर्ण मराठवाड्यात हे आंदोलन एकाच दिवशी करण्यासाठी आवाहन केले होते होते आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणजे आपले कर्तव्य पार पाडून सर्व कर्मचारी आंदोलनासाठी आले होते मराठवाडा शिक्षक संघाच्या ब्रीद वाक्यानुसार भयमुक्त शिक्षक, भ्रष्टाचार मुक्त, गुणात्मक शिक्षण, कर्तव्याचे अनुपालन व हक्कासाठी संघर्ष ! याचे काटेकोरपणे पालन करून सर्व कर्मचारी आंदोलनासाठी विशेष करून हजर होते आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या अशा १) अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शाळांना शंभर टक्के अनुदान मिळालेच पाहिजे २) सर्वांना जुनी पेन्शन लागू झाली पाहिजे ३) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०, २०,३० ही आश्वासित प्रगती योजना लागू करावी ४) इंग्रजी शाळेतील कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता देण्यात याव्या ५) आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनातील अनिमितता दूर व्हायला पाहिजे या व अशा इतर २६ मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री व शिक्षण मंत्री यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात यांच्यामार्फत जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे व जिल्हा सचिव संजय येळवंते,कोषाध्यक्ष नारायण मुंडे यांच्या हस्ते देण्यात आले यावेळी कार्याध्यक्ष फरखुंद अली सय्यद,जिल्हा उपाध्यक्ष जगन वाघमोडे, जिल्हा सचिव संजय येळवंते, केंद्रीय उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटे, जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, प्रा डॉ राज्यक्रांती वलसे, मार्गदर्शक डॉ मारुती तेगमपुरे यांनी आंदोलन कर्त्यांना संबोधित केले. आंदोलन कर्त्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये केंद्रीय कार्यकारणी सदस्य आरेफ कुरेशी, उपाध्यक्ष भीमाशंकर शिंदे, सहसचिव प्रद्युम्न काकड, प्रसिद्धीप्रमुख हकीम पटेल, भगवान धनगे गणेश मेहेत्रे, रमेश गाढे, कैलास मांटे विष्णू इप्पर, शिवहारी कायंदे, ज्ञानेश्वर पवार, राधेश्याम चौधरी , विष्णू भाबट,रशीद शेख,संजय चव्हाण,शेख आतिक,अब्दुल करीम, सोहम बोदवडे,इमरान सिद्दिकी,भगवान पालकर,शिरीन बेगम शहा, शिवकन्या काळे हे व इतर शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.